# आरे ते बीकेसी मेट्रो पुढील वर्षअखेरीपर्यंत

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो रेल्वे प्रकल्पातील आरे ते बीकेसीच्या पहिल्या टप्प्याचे जवळपास ७६ टक्के काम पूर्ण झाले असून, हा पहिला टप्पा डिसेंबर, २०२३मध्ये सुरू होणार असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल्वे कार्पोरेशनचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी शुक्रवारी दिली. तर दुसऱ्या टप्प्यातील बीकेसी ते कुलाबा या मार्गावर जून, २०२४पर्यंत मेट्रो धावेल, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

मुंबई मेट्रो ३च्या कामाचा पाहणी दौरा शुक्रवारी आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत एस. के. गुप्ता यांनी वरील माहिती दिली. या प्रकल्पाचे काम ऑक्टोबर, २०१६मध्ये सुरू झाले असून, ही मेट्रो सुरू झाल्यावर मुंबईतील वाहतूक कोंडीवर मात होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मेट्रोमधून एका वेळी अडीच हजार असे दररोज किमान १७ लाख प्रवासी प्रवास करतील. या मार्गावर एकूण २७ स्थानके असून, त्यातील २६ स्थानके भूमिगत असतील. भूमिगत स्थानकांसाठी बांधण्यात आलेल्या भुयारांचे काम ९९.६ टक्के पूर्ण झाले आहे. मेट्रोचा खर्च सुरुवातीला सुमारे ३३ हजार ४०४ कोटी रु. होता. पण करोना काळानंतर तो ३८ हजार कोटी रुपयांवर पोहोचला.